महाराष्ट्र शासन

# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१, २, ५ व ६ हजारीमल सोमानी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई- ४०० ००१ ०२२-२२०५७४०९/२२०७२०९७/२२८२१८१० फॅकस ०२२ २२०१८५३९
E-mail : mah-sforum@nic.in Website:- www.grahak.maharashtra.gov.in

---

जा.क्र.राआ/महा./आस्था/बाहय.मनुष्यबळ पुर./निविदा/२५/ २४७ दि - १३ .०१.२०२५

# निविदा सूचना

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई व अधिपत्याखालील परिक्रमा खंडपीठ नागपूर व औरंगाबाद व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग या कार्यालयाकरीता मासिक दरावर शिपाई- ७६, रखवालदार-२ व वाहनचालक-१ यांच्या सेवेची आवश्यकता आहे. त्यानुसार मासिक दरावर शिपाई, रखवालदार व वाहनचालक पुरविण्याबाबत निविदाधारकांकडून व्दि (Double)लिफाफा पध्दतीने २ वर्षाकरीता तांत्रिक व आर्थिक निविदा मागविण्यात येत आहे.

उदयोग, उर्जा व कामगार विभागाच्या क्रमांक भांखस २०१४/प्र.क्र.८२/भाग ।।।/उदयो ४, दिनांक ०१.१२.२०१६ च्या शासन निर्णयानुसार स्पर्धेत भाग घेणा-या निविदाकाराने भरावयाच्या निविदा शुल्क ना-परतावा (Tender fee-Non refundable) आणि बयाणा रकमेचा तपशिल दिलेला असून त्यानुसार रु. ५,४२,००,०००/- (अक्षरी रुपये पाच कोटी बेचाळीस लाख ) अंदाजित किंमतीसाठी स्पर्धेत भाग घेणा-या निविदाकाराने रु. १०,०००/- Tender fee आणि रु. १,००,०००/- बयाना रक्कम (EMD {INR}) यांचा भरणा करणे आवश्यक राहील.

सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदा ऑनलाईन पध्दतीने संगणकीय आज्ञावलीत होईल. यासंदर्भात https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सूचना व विहित नमुन्यातील अर्ज प्रसिध्द करण्यात आला असून निविदाधारकांकडून महाराष्ट्र शासन, उद्योग व कामगार विभाग अधिसूचना दिनांक २४, जुलै २०१९ च्या अनुषंगाने कामगारांना निर्धारित केलेल्या वेतनाचे किमान दराच्या अधिन राहून खाली नमूद केलेल्या कालावधीत online निविदा अर्ज मागविण्यात येत आहेत.

प्राप्त झालेल्या निविदापैकी कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे अधिकार मा.अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई राखून ठेवत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सेवेचा कालावधी | २ वर्षे |
| २ | निविदा फॉर्म स्विकारण्याची तारीख | दि. १६.०१.२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता पासून दि. ३१.०१.२०२५ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत |
| ३ | प्री-बिड बैठक | दि. २७.०१.२०२५ दुपारी ३.०० वाजता (वरील नमुद कार्यालयीन पत्त्यावर) |
| ४ | निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख व वेळ | दि. ३१.०१.२०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत |

| | | |
|---|---|---|
| ५ | तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक | दि. ०३.०२.२०२५ दुपारी ३.०० वाजता किंवा राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे कार्यालय ठरवेल त्याप्रमाणे |
| ६ | आर्थिक निविदा उघडण्याची तारीख व वेळ | दि. ०७.०२.२०२५ दुपारी ३.०० वाजता प्रबंधक (प्रशासन), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांचे दालनात किंवा राज्य आयोगाचे कार्यालय ठरवेल त्याप्रमाणे |

सदर ई-निविदा करीता www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर विहित नमुन्यातील अर्ज प्रसिध्द करण्यात आला असून, ई-निविदा प्रकियेबाबतची संपूर्ण माहिती tender document मध्ये स्वतंत्र्यरित्या देण्यात आलेली आहे.

Sd/-
(उमेश सु. चव्हाण)
प्र. प्रबंधक (प्रशासन)
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग
महाराष्ट्र, मुंबई